# जागतिक महिला दिवस

दिनांक ८ मार्च, २०२२ रोजी संस्थेत जिमखाना व महिला समिती यांच्या संयुक्त विद्यमानाने जागतिक महिला दिवस मोठ्या उत्सवात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्राचार्य डॉ. गवलवाड सर होते तसेच प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती. महेक स्वामी (भापोसे), अतिरिक्त पोलीस अधिक्षक वाशिम ह्या उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरवात भारतीय परंपरेनुसार मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून सरस्वतीपूजनाने झाली. याप्रसंगी मार्गदर्शक म्हणून लाभलेल्या श्रीमती. महेक स्वामी (भापोसे) यांनी विद्यार्थिनिंना **“ सायबर सुरक्षा व गुन्हे ”** या विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन व यशस्वीतेकरीता जिमखाना उपाध्यक्ष प्रा. राहुल महाजन, महिला समिती अध्यक्षा प्रा. प्रिया मोरे, प्रा. एम. डी. मोरे, प्रा. पूजा पवार, प्रा. के. के. चौधरी यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यकमाला संस्थेतील महिला अधिकारी व कर्मचारी वर्ग तथा सर्व विद्यार्थिनी मोठ्या संखेने उपस्थित होत्या. **जागतिक महिला दिवस कार्यक्रमाचे काही क्षणचित्रे !!!**








